# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे यांचे कार्यालय पुणे -१

१७ डॉ. आंबेडकर रोड, लाल देवळाजवळ पुणे-१
दुरध्वनी क्रमांक ०२०- २६१२२२१७ फॅक्स क- ०२०- २६१२२२१७
ई-मेल आयडी- dydpune@gmail.com वेब साईट- WWW.dydepune.com

**महत्त्वाचे**

**जा.क्र.शिउसं/उमाशि-४०३/११ वी/पुवि/२०१६**
दिनांक :- 27/4/2017.

**प्रति,**

**सर्व प्राचार्य/प्राचार्या**
**उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय,**
**पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्र**

विषय :- **इयत्ता ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सन २०१७-१८ रजिस्ट्रेशनबाबत**

संदर्भ:- **१)शासन निर्णय क्रमांक न्यायाप्र-२०१५/(६१/१५)एसडी-२ दि.२८.०३.२०१६**
**२)शासन निर्णय क्रमांक प्रवेश-२०१६/(१८०/१६)एसडी-२ दि.०७.१.२०१७**
**३) या कार्यालयाचे पत्र ०५.०४.२०१७.**

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश-२०१७-१८ चे कामकाज पुणे व पिंपरी चिंचवड, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०१.२०१७ अन्वये सुरु करण्यात आलेले आहे.

संदर्भ क्र-३ च्या पत्रान्वये दि. ०६.०४.२०१७ ते १०.०४.२०१७ अखेर कॉलेज ऑनलाईन नोंदणी प्रक्रिया सुरु करण्यात आलेली होती व याबाबत वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आलेली होती, तसेच याबाबत आपणास भ्रमणध्वनीवर नोंदणी बाबत सुचना देण्यात आलेल्या आहे. आज अखेर सर्व नोंदणी झालेल्या कनिष्ठ महाविद्यालये पडताळणी **(Verify)** केलेल्या प्रतीमध्ये काही दुरुस्ती असल्यास (उदा.:- कॉलेजचे नांव, युडायस नं, विषय इ.) उद्या **दिनांक २८.०४.२०१७ रोजी सकाळी ११.०० ते ५.०० वाजेपर्यंत शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे येथे श्री. एम डी आवारी** यांचेकडे जमा करुन दुरुस्ती असल्यास dydlogin मधून दुरुस्ती करुन घेण्यात यावी. आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती माहितीपुस्तकामध्ये समाविष्ट करण्यापुर्वी तपासणे अनिवार्य आहे. सदर बाबत माहिती तपासणी न करुन घेतल्यास व काही त्रुटी राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी प्राचार्य यांची राहील याची नोंद घ्यावी.

MRaut
27.4.17
(मिनाक्षी राऊत)
सचिव
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
सहा.शिक्षण संचालक
पुणे विभाग पुणे-१

**प्रत माहितीसाठी सविनय सादर :-**
१) मा. आयुक्त(शिक्षण) म.रा. पुणे
२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा.पुणे